नि.फौ.मा.क्र.१८०/२०२२

**सरकार –वि– दादाराव व इतर**

**निशाणी क्रमांक ३६**

**सरकार तर्फे साक्षदार क्रमांक ०२ ची साक्ष शपथेवर सुरू** :–

माझे नाव :– गुणवंता श्रीकृष्ण भोजने

वय :– २५ वर्ष, व्यवसाय :– शिक्षण

राहणार :– कालखेड , ता. शेगाव, जिल्हा बुलडाणा.

**सरतपासणी : सरकारी वकील श्रीमती शहा यांच्यामार्फत सुरू** :–

१. मी सर्व आरोपींना ओळखतो. ते सर्व माझे नातेवाईक आहेत. सर्व आरोपींनी दि. २८.०६.२०२२ रोजी दुपारी ११.०० ते ११.३० च्या दरम्यान अस्परा ड्रेसेस समोर, शिवाजी चौक शेगाव येथे मारहाण केली होती. माझी पत्नी स्नेहल मला अस्परा ड्रेसेस समोर दिसली तेथे तिच्यासोबत राजकुमार इंगळे होता. त्यावेळी मी माझ्या पत्नीसोबत बोललो. माझी पत्नीचे व माझे लव मॅरेज झाले होते व आम्ही सदर लग्न चोरुन केले होते. ज्यावेळी माझ्या बायकोच्या घरी आमच्या लग्नाबद्दल कळले त्यावेळी माझे व तिचे बोलणे बंद झाले. त्यामुळे मी माझ्या पत्नीच्या माहेरच्या लोकांच्या विरुध्द उरळ पोलीस स्टेशन येथे तक्रार केली होती तसेच शेगाव न्यायालयात दिवाणी दावा दाखल केला होता. माझे लग्न स्नेहल सोबत दि. १६.०७.२०२१ रोजी झाले होते. ज्यावेळेस मी माझ्या पत्नीसोबत बोलत होतो त्यावेळेस मला आरोपी राजकुमार इंगळे याने कड्याने डोळ्याखाली, पोटावर व पसळीवर मारहाण केली. तसेच सर्व आरोपींनी मला चापटा बुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला जाऊन फिर्याद दिली. आता मला फिर्याद व छापील एफ.आर. आर. दाखविली, त्यावर माझ्या सह्या आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **नि.क्र. ३७ व ३८** देण्यात येते. मी फिर्याद दिल्यानंतर पोलीसांनी मला सरकारी दवाखाना शेगाव येथे पाठविले होते. पोलीसांनी दुस–या दिवशी माझ्याकडे विचारपुस करुन मला घटनास्थळावर घेऊन गेले होते. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता. ज्या कड्याने मला मारहाण झाली होती तो पाहिल्यास मी ओळखु शकतो. आता मला मुदे्दमाल क्र. १००/२०२२ दाखविण्यात आले. हा तोच कडा आहे ज्याने आरोपी राजकुमार याने मला मारहाण केली होती. त्यास **वस्तु क्र. 'अ'** देण्यात येते. आता मला स्नेहलसोबत झालेल्या माझ्या लग्नाबद्दल विवाह नोंदणी प्रमाणपत्राची

छायांकीत प्रत दाखविली. त्यास **वस्तु क्र. 'ब'** देण्यात येते. आरोपींना पाहिल्यास मी ओळखु शकतो. सर्व आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपी क्र. १ व २ तर्फे श्री. वानखडे वकिल साहेब यांचे मार्फत</u> –**

२.        हे म्हणणे खरे आहे की मी कालखेड येथे राहत असुन ते शेगाव तालुक्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की स्नेहल व मी कोर्ट मॅरेज केले व स्नेहल ही लोहाऱ्याची आहे व लोहारा हे अकोला जिल्ह्यात येते. माझ्या गावापासुन शेगावचे अंतर ९ कि.मी. आहे. तसेच लोहाऱ्यापासुन शेगाव सुध्दा अंदाजे ९ किमी असेल. मला घटनेच्या वेळेस हे माहिती नव्हते की स्नेहल व राजकुमार हे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की २८.०६.२०२२ रोजी दुपारी ११.०० ते ११.३० च्या दरम्यान स्नेहल व राजकुमार यांना अस्परा ड्रेसेस समोर पाहिले हे मी खोटे सांगत आहे. हे मला माहिती नाही की स्नेहलची आई व वहीणी घरकाम व शेती करतात. हे म्हणणे खरे नाही की त्यादिवशी ते शेगाव मध्ये आले नाही ते फक्त स्नेहलचे नातेवाईक असल्यामुळे मी त्यांच्या विरुध्द खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की राजकुमार व दादाराव हे स्नेहलचे मामा व मामेभाऊ असल्यामुळे त्यांना फसवण्याकरीता मी त्यांचे नाव सदर केसमध्ये टाकले. हे म्हणणे खरे आहे की वस्तु क्र. 'अ' कडा हा बाजारात सहजरित्या उपलब्ध असतो. हे म्हणणे खरे नाही की वस्त क्र. 'अ' कडा हा नविन आहे जर हा तोच कडा असता तर तो जुना झालेला असता व त्याला काही क्रॅचेस असते. मी पोलीसांना जबाब देतेवेळेस सांगीतले होते की ज्यावेळी मी माझ्या पत्नीसोबत बोलत होतो आरोपी राजकुमार याने कड्याने डोळ्याखाली व पसळीवर मारले परंतु सदरचा मजकुर माझ्या जबाब का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र. ३ व ४ तर्फे श्री. बनारसे वकिल साहेब यांचे मार्फत</u> –**

३.        हे मला माहिती नाही की कालखेड ते उरळ हे चे अंतर अंदाजे ३० ते ३५ किमी आहे. मी सकाळी ९.०० वाजता शेतात गेलो होतो तेथे अर्धा तास थांबलो त्यानंतर मी उरळला गेलो. हे म्हणणे खरे नाही की सन २०२२ जुन मध्ये सदर रस्ते चांगले नव्हते.

**प्रश्नः** तुम्ही जेव्हा उरळ येथे चौकशी करायले गेले होते त्यावेळी तुम्हाला असे कळले की उरळ येथे आरोपींविरुध्द तक्रार दाखल करता येत नाही?

**उत्तरः** नाही तसे नाही त्यावेळेस तेथे साहेब नव्हते मला तेथील पोलीसांनी सांगीतले की तुम्ही नंतर या.

४.        हे मला माहिती नाही की आरोपी क्र. ३ व ४ यांच्या विरुध्द मी दिलेल्या तक्रारी वरुन उरळ पो.स्टे. येथे तक्रार दाखल नसुन बाळापुर येथे न्यायालयात प्रकरण दाखल नाही. मी दिलेल्या तक्रारीची प्रत तपासा दरम्यान तपासी अंमलदाराला दिलेली नाही. हे मला माहिती नाही की शेगाव न्यायालयात जी तक्रार मी दाखल केली होती ती न्यायालयाने खारीज केली आहे. हे म्हणणे खरे आहे की अकोला न्यायालयात नांदण्याकरीता जो दावा दाखल केला होता तो दावा न्यायालयाने खारीज केला आहे. मी सदर दोन्ही खारीज प्रकरणाबाबत अपील दाखल केलेले नाही. असे काही नाही की स्नेहल माझ्या सोबत लग्न झाल्यानंतर नांदत नाही याचे दोषी तिचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे  नाही की मी दिलेल्या तक्रारीवरुन उरळ पोलीसांनी कोणतीही कार्यवाही केली नसल्यामुळे मी आरोपींविरुध्द शेगाव येथे खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की सदर तक्रारीवरुन मला आरोपींवर दबाव आणायचा होता. हे म्हणणे खरे नाही की मला सर्व आरोपींनी चापटा बुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली तसेच जिवे मारण्याची धमकी दिली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>फेरतपास नाही.</u>**

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.**

**स्वा./–**

**( एम. के. गोटे )**

न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,

शेगाव.(कोर्ट नं.२)

दिनांक –१०.०३.२०२५.

**माझे समक्ष,**

**स्वा./–**

**( एम. के. गोटे )**

न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,

शेगाव.(कोर्ट नं.२)

दिनांक – १०.०३.२०२५.